महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD . PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - sscboardpune@gmail.com |
|---|---|---|
| 25536722 (OFF) | 25536781/82/83 / 25536712(OFF) | Website- www.sscboardpune.in |


क्रमांक पुविमं/माध्य./क/446
पुणे–४११००५-
दिनांक– २०/०१/२०२५.

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा
पुणे,अहमदनगर,सोलापूर .

**विषय:-** फेब्रु-मार्च-२०२५ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत (Hall Ticket) .....

**संदर्भ:-** क्रमांक रा.मं./परीक्षा-/१९८/दिनांक:-१७/०१/२०२५.

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, फेब्रु-मार्च-२०२५ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) परीक्षेचे ऑनलाईन प्रवेशपत्र उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

सदर सर्व माध्यमिक शाळांना फेब्रु-मार्च-२०२५ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) परीक्षेची प्रवेशपत्रे (Hall Ticket) ऑनलाईन (online) पध्दतीने मंडळाच्या **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर **सोमवार दि.२० जानेवारी २०२५** पासून school login मध्ये download करण्याकरिता उपलब्ध होतील. यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उदभवल्यास माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे त्वरित संपर्क साधावा. ऑनलाईन प्रवेशपत्रे (Hall Ticket) उपलब्ध करून घेण्याच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की,

१. फेब्रु-मार्च-२०२५ मधील (इ.१० वी ) परीक्षेसाठी सर्व माध्यमिक शाळांनी इ.१० वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२. प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेउ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक यांचा शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

३. ज्या आवेदनपत्रांना ''paid'' असे status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे Paid status Admit card या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

४. अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No. विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे ''Extra Seat No. Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

५. Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव / जन्मतारीख / जन्मठिकाण अशा दुरुस्त्या असल्यास सदर दुरुस्त्या Online पध्दतीने करावयाच्या असून त्याकरिता Application Correction ही Link उपलब्ध करुन देण्यात आलेली असून विहित दुरुस्ती शुल्क भरुन दुरुस्त्या विभागीय मंडळाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात याव्यात व विभागीय मंडळाच्या मान्यतनंतर "Correction Admit card" या Link व्दारे सुधारीत Admit card उपलब्ध होतील. विषय/ माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरुस्त्या करण्यात याव्यात.

CamScanner

६. ज्या आवेदनपत्रांना "Paid" असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होवून Late paid Status Admit Card या Option व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबधित मुख्याध्यापकांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८. प्रवेशपत्र विद्यार्थ्याकडून गहाळ झाल्यास संबधित माध्यमिक शाळांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत (Duplicate) असा शेरा देवून विद्यार्थ्यास प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

तरी फेब्रु-मार्च-२०२५ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी ) परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेले सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक सर्व माध्यमिक शाळा यांनी उपरोक्त बाबींची नोंद घेवून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-०५.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी
१-विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग पुणे.
२-शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हापरिषद, पुणे/अहमदनगर/सोलापूर

CamScanner